# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### तलासरी (जि.पालघर) तालुक्यात बस आगर सुरु करण्याबाबत

**(१) ५६८५६ (१५-०५-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) तालुक्यात ९८ टक्के आदिवासी लोकवस्ती असुन या गावात बस जात नसल्यामुळे दळणवळणाची समस्या निर्माण झाली आहे तसेच तालुक्यात ४८ महसुली गावे, २१ ग्रामपंचायती व एक ग्रामदान असून ग्रामस्थांना बसची सुविधा नसल्यामुळे गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलासरी तालुका बस आगराविना आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती तलासरी तालुक्यात बस आगर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१८-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) तलासरी तालुक्यातील प्रवाशी जनतेची २७ मार्गावर ६९ फेऱ्यांद्वारे राज्य परिवहन सेवा देऊन सोय करण्यात आली आहे. तलासरी परिसरातील प्रवाशी वाहतूक ही नजिकच्या ३३.५ कि.मी. अंतरावर असलेल्या डहाणू आगारामार्फत चालविण्यात येत आहे. वाहतुकीची तौलनिक निकड पहाता सदर ठिकाणी रा.प. बसस्थानकाची बांधणी करण्यात आलेली आहे. आगार निश्चिती विषयक महामंडळाच्या निकषानुसार तलासरी येथे आगार बांधण्याचे नियोजन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील एसटी महामंडळाच्या बसस्थानकांत**
**स्वच्छता कर्मचारी भरण्याबाबत**

**(२) ५६८७५ (१५-०५-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील एसटी महामंडळाच्या बसस्थानकांत दररोज हजारो प्रवासी ये-जा करीत असूनही या बसस्थानकांची स्वच्छता करण्याकरिता केवळ ११ कर्मचारी असल्याने सदरच्या बसस्थानकांत अस्वच्छता असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनास कंत्राटी स्वरुपात स्वच्छता कर्मचारी भरण्याची मान्यता असतांना प्रशासन टाळाटाळ करीत असुन अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसंदर्भात कोणतेच निर्णय घेण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती कंत्राटी स्वरुपात स्वच्छता कर्मचारी भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१८-०९-२०१८) :** (१) नाही.

नाशिक आगाराच्या देखरेखीखाली १२ सफाईगारांकडून बसस्थानक व वाहनतळाची दैनंदिन स्वच्छता करुन घेण्यात येते.

(२) व (३) नाशिक विभागामध्ये अनुकंपा तत्वावरील सफाईगार पदाची ५ प्रकरणे मंजूर असून रिक्त जागेअभावी प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात आली आहेत. नाशिक विभागात सफाईगार पदाच्या ४१ जागा मंजूर असून ४१ जागांवर सफाईगार कर्मचारी कार्यरत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नांदेड विभागात असलेल्या रिक्त पदांबाबत**

**(३) ५९१३५ (१५-०५-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नांदेड विभागात ४ हजार २७२ मंजुर पदांपैकी १ हजार ५३ पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उत्पन्न वाढीसाठी वेगवेगळया उपाययोजना आखल्या जात असुन पदे रिक्त राहण्यामागीची कारणे काय आहेत,

(३) असल्यास नांदेड विभागासह बहुतांश आगारातील प्रमुख पदे रिक्त आहेत त्यामध्ये लेखाकार, सहायक कार्यशाळा अधिक्षक, कनिष्ठ अभियंता वरिष्ठ लिपिक आणि पदे रिक्त आहेत उक्त पदे रिक्त असल्याने महामंडळाच्या उत्पन्न वाढीवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१८-०९-२०१८) :** (१) राज्य परिवहन महामंडळाच्या नांदेड विभागामध्ये माहे मे, २०१६ मध्ये वर्ग-१ ते ४ पदांमधील एकूण मंजूर ३६६९ पदांपैकी ३२१३ पदे कार्यरत व ४५६ पदे रिक्त होती.
(२), (३), (४) व (५) चालक तथा वाहक, सहाय्यक, लिपिक-टंकलेखक, लेखाकार, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक, कनिष्ठ अभियंता इ. पदांतील रिक्त जागा भरण्याकरिता महामंडळाद्वारे दि.०५.०१.२०१७ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

तसेच, लेखाकार प्रवर्गाची खातेबढती परिक्षा घेण्यात आली असून उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना नेमणूका देण्यात आल्या आहेत. सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक या पदाच्या खातेबढती परिक्षेकरिता पात्र कर्मचाऱ्यांची माहिती मागविण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जळगांव जिल्हयातील शेतक-यांनी धरणे-आंदोलने केल्याबाबत

**(४) ७७३८४ (१४-०४-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील अनेक तालुक्यात शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, विजबिलमाफी, पिक विम्याची रक्कम, ज्वारी, मका, भाजीपाला, सोयाबीन, कापूस या मालास हमीभाव व मागेल त्याला रोजगार हमीची कामे इत्यादी मागण्यांसदर्भात शेतकऱ्यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान धरणे-आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) खरीप व रब्बी हंगाम २०१६ मध्ये राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात आलेली होती. जळगाव जिल्हयामध्ये सदर योजना खरीप हंगामासाठी भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत तर रब्बी हंगामासाठी नॅशनल इंशुरन्स कंपनीमार्फत राबविण्यात आलेली होती. प्रस्तुत योजनेंतर्गत खरीप व रब्बी हंगाम २०१६-१७ साठी जळगाव जिल्हयातील १.८७ लाख शेतकऱ्यांनी २.५० लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले होते. त्यापैकी उपरोक्त योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ९३७० शेतकऱ्यांना ४३१.७५ लाख इतकी नुकसान भरपाई संबंधित विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली असून, नुकसान भरपाईची रक्कम पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी शेतकऱ्यांच्या संबंधित बँकाकडे विमा कंपनीमार्फत वर्ग करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंतप्रधान पिक विमा योजनेत विडूळ, पोफाळी, मुळवा (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) क्षेत्र हरभरा पिकासाठी वगळल्याबाबत**

**(५) ८०६६८ (१४-०४-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान पिक विमा योजनेत उमरखेड (जि. यवतमाळ) विधानसभा मतदार संघातील विडूळ पोफाळी, मुळवा क्षेत्र हरभरा पिकासाठी वगळल्याबाबत मा. मुख्यमंत्री व मा. कृषिमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ जानेवारी,२०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने याबाबत निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, उक्त क्षेत्र हरभरा पिकासाठी वगळण्यात येऊ नये याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) होय. मात्र, विडूळ पोफाळी, मुळवा ही महसूल मंडळे हरभरा पिकासाठी अगोदर पासूनच अधिसूचित नव्हती. त्यामुळे प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत सदरची मंडळे वगळलेली नाहीत. तथापि, कृषि सहसंचालक, अमरावती यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार, रब्बी हंगाम २०१७-१८ पासून विडूळ आणि मुळावा या महसूल मंडळांना हरभरा या पिकासाठी नव्याने अधिसूचित करुन, प्रधानमंत्री पिक विमा योजनेत त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील चुकीच्या पद्धतीने हवामानाच्या नोंदीचा आधार घेतल्याने शेतकरी विमा रक्कमे पासून वंचित राहिल्याबाबत**

**(६) ८०७०८ (१४-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हवामानावर आधारित काढलेल्या पीक विमा परताव्यासाठी सॅटेलाईटद्‌वारे घेतलेल्या हवामानाच्या नोंदीचा आधार घेतला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे चुकीच्या पध्दतीने आधार घेतल्याने शेतकरी विमा रक्कमेपासून वंचित राहत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदेड जिल्हयातील सुमारे ८ हजार उत्पादकांना सन २०१५-१६ मधील पीक विम्याची रक्कम न देणा-या विमा कंपन्यांची चौकशी करण्याचे आदेश मा.पणन राज्यमंत्री यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या आदेशानुसार करण्यात आलेल्या चौकशीत काय आढळून आले,
(५) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०९-२०१८)** :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

हवामान आधारित पीक विमा योजनेंतर्गत मार्गदर्शक सुचनांनुसार संदर्भ हवामान केंद्रावर नोंद झालेल्या हवामान घटकांच्या आकडेवारीच्या आधारे नुकसान भरपाई निश्चित केली जाते. खरीप हंगाम २०१५ मध्ये राज्यातील ६.७६ लाख शेतकऱ्यांनी १२८.४१ कोटी रुपये विमा हप्ता भरुन योजनेत सहभाग घेतला होता. त्यापैकी ६.६१ लाख शेतकऱ्यांना रु.२६९.८३ कोटी इतकी नुकसान भरपाई संबंधित विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे.

(३) हवामान आधारित पिक विमा योजना खरीप हंगाम २०१५ मधील नुकसान भरपाई अदायगी न झालेबाबत मा. राज्यमंत्री पणन यांचे जानेवारी २०१७ वा त्यादरम्यानचे चौकशी आदेश प्राप्त नाहीत.

खरीप हंगाम २०१५ मध्ये हवामान आधारित पिक विमा योजना नांदेड जिल्हयात भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत राबविण्यात आली होती. जिल्हयातील २९,८३१ शेतकऱ्यांनी ४.९९ कोटी विमा हप्ता भरुन योजनेत सहभाग घेतला होता. त्यापैकी २८,८२२ शेतकऱ्यांना रु. ९.५५ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आर्णी (जि.यवतमळ) तालुक्यात पिक विमा योजने अंतर्गत शेतकऱ्यांना पिक विमाचा लाभ न मिळण्याबाबत

**(७) ८१००८ (१४-०४-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती, यवतमाळच्या दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजीच्या सभेत आर्णी तालुक्यातील शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ न झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी आर्णी (जि. यवतमाळ) यांनी विचारणा केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्णी तालुक्यात झालेल्या पिकांच्या नुकसानाची तपासणीसाठी पथकच गेले नसल्याचे निदर्शनास आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून तपासणी पथकाबाबतची संपूर्ण माहिती लिखित स्वरुपात उपलब्ध करून देणेबाबत संबंधितांना सूचित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

खरीप हंगाम २०१६ मध्ये यवतमाळ जिल्हयात तसेच अर्णी तालुक्यात नियोजनानुसार सर्व पीक कापणी प्रयोग घेण्यात आलेले आहेत. खरीप हंगाम २०१६ मध्ये यवतमाळ जिल्हयातील ४.०२ लाख शेतकरी योजनेत सहभागी झाले होते. त्यापैकी ६४,२२४ शेतकऱ्यांना रु.३५.०२ कोटी इतकी नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत मंजुर करण्यात आलेली असून अर्णी तालुक्यातील ९४९९ शेतकऱ्यांना रु.५.०८ कोटी इतकी नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आलेली आहे व पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यास्तव संबंधित बँकांना वर्ग करण्यात आलेली आहे. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, यवतमाळ यांचेकडून प्राप्त अहवालानुसार अर्णी तालुक्यातील पीक कापणी प्रयोगांमध्ये आलेल्या उत्पन्नाची मंडळनिहाय, पीकनिहाय माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील हवामानावर आधारीत फळपिक विमा योजनेसाठी बसविलेले हवामान उपकरण बंद असल्याबाबत**

**(८) ८१६७३ (१४-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात ब-याच प्रमाणात फळपिक लागवड केले जाते अशा स्थितीत हवामानावर आधारित फळपिक विम्याकरीता हवामानाची स्थिती दर्शविणारे हवामान उपकरण नादुरस्त अवस्थेत असल्याने येथील शेतक-यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास तदनुसार हवामान उपकरण दुरस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०९-२०१८) :** (१) नाही.

वाशिम जिल्हयातील स्वयंचलीत हवामान केंद्रे ही शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार स्थापित केलेली आहेत. यामधील महसूल मंडळसाठी सदर कालावधीमध्ये हवामान केंद्रांने प्रमाणीत केलेल्या आकडेवारीचा वापर करून नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना विमा नुकसान भरपाई दिल्याचे रिलायन्स कंनीने दि.१७ जुलै, २०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतकरी अपघात विमा योजनेमधील शेतकऱ्यांच्या कुटूंबातील व्यक्तींना अर्थ सहाय्य मिळणेबाबत**

**(९) ९६७१२ (२७-१२-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या शेतकरी अपघात विमा (वीज पडून होणारे मृत्यू राज्य आपत्ती म्हणून घोषित करण्याबाबत, शासन निर्णय क्रमांक:-आव्यप्र-२०१७/प्र.क्र.२१९/आव्यप्र-१/ दि. ४ ऑक्टोबर, २०१७) योजनेमधील लाभार्थींची नावे सातबारा नोंदीऐवजी त्या कुटूंबातील रेशन कार्डावर नावे असणाऱ्या व्यक्तींनाही या योजनेतून अर्थ सहाय्य मिळावे याबाबत योजनेमध्ये दुरुस्ती करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा. कृषी मंत्री, मा. महसूल मंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीअंती उक्त योजनेमधील लाभार्थींची नावे सातबारा नोंदीऐवजी त्या कुटूंबातील रेशन कार्डावर नावे असणाऱ्या व्यक्तींनाही या योजनेतून अर्थ सहाय्य मिळावे याबाबत योजनेमध्ये दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेंतर्गत योजनेच्या अटी व शर्तीनुसार दाखल होणारे सर्व प्रस्ताव मंजूर करुन त्या सर्वांना योजनेचा लाभ देण्यात येतो. सद्यस्थितीमध्ये प्रस्तुत योजनेंतर्गत ७ /१२ धारक शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्यात येते. शेतकऱ्यांप्रमाणेच शेतकऱ्यांवर अवलंबुन असणाऱ्या तसेच त्याच्या कुटुंबातील रेशन कार्डावर नावे असणाऱ्या व्यक्तिनांही गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेच्या धर्तीवर लाभ देण्यासाठी अपघात विमा योजना सुरु करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दापचारी येथे दुग्ध प्रकल्प पुर्नजिवित करणेबाबत**

**(१०) ९९४४६ (२९-१२-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आशिया खंडातील सर्वात मोठा दुग्ध प्रकल्प आणि मुंबईला मुबलक प्रमाणात दूध पुरवता यावे यासाठी १९७४ मध्ये महत्वाकांशी प्रकल्प उभारण्यात आला मात्र शासकीय अधिकाऱ्याच्या व शासनाच्या दुर्लक्षति धोरणांमुळे दुग्ध प्रकल्पाची दयनीय अवस्था असून सदर दुग्ध प्रकल्प पुर्नजिवित करणेबाबत दि.१३ ऑक्टोबर २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पात काही मूळ कृषीक्षेत्रधारकांच्या नावावर मुंबई व इतर परिसरातील अन्य धनदांडग्यांनी बांधकाम करून बंगले,फार्म हाऊस तयार केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय,

(४) असल्यास,चौकशीअंती प्रकल्पाच्या जागेत पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करणे,मत्स्यकेंद्र उपाययोजना करणे, कृषीक्षेत्रधारक असलेल्या कुटुंबाचा विचार करणे,आदिवासी कुटुंबाच्या कब्जात असलेल्या कसणाऱ्या जमिनी नावावर करणे,प्रकल्पाची जमीन इतर कारणासाठी कंपनीस देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२६-०९-२०१८) :** (१) मुंबई व उपनगरातील दुधाचा तूटवडा भरून काढण्यासाठी तसेच मुंबईकरांना स्वच्छ व निर्भेळ दूध मिळावे या उद्देशाने आरे दुग्धवसाहतीच्या धर्तीवर नवीन दुसरी दुग्ध वसाहत दापचरी येथे सप्टेंबर, १९६२ मध्ये स्थापन करण्यात आली होती हे खरे आहे. मात्र सदर दुग्ध प्रकल्प पुनर्जिवित करण्याबाबत कोणताही प्रस्ताव शासनाच्या सद्यस्थितीत विचाराधीन नाही.

(२)दापचरी येथील करारनामा करुन वाटप करण्यात आलेल्या काही कृषि क्षेत्रधारकांनी वाढीव बांधकाम केलेले आहे हे खरे आहे.

(३)सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे.

(४)शासनाने दापचरी येथील दुग्धव्यवसाय विकास विभागाची ४४७.२९ हे. जमिन पशुसंवर्धन विभागाच्या योजनांसाठी देण्याकरीता महसुल विभागाकडे सन २०१७ मध्ये हस्तांतरीत केली आहे. तसेच मत्स्यव्यवसाय विभागामार्फत मत्स्यबिज केंद्र सदर ठिकाणी कार्यान्वीत आहे. आदिवासी कुटूंबाच्या कब्जात असलेल्या व कसणाऱ्या जमिनी नावावर करण्याबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या अपिल प्रकरणी आयुक्त,दुग्धव्यवसाय यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीसमोर सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

(५)प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### उमरगा (जि.उस्मानाबाद) येथील बीजगुणन कार्यालयाच्या मालकीच्या पडीक जमिनीबाबत

**(११) १०२४५६ (२७-१२-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा (जि.उस्मानाबाद ) येथे बीजगुणन कार्यालयाच्या मालकीच्या असलेल्या एकूण १३० एकर शेतजमिनीपैकी केवळ ४० एकर जमीन वापरात असून उर्वरित ९० एकर शेतजमीन दुर्लक्षित असल्याने वापराविना पडीक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित ९० एकर क्षेत्रावर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या लाभाचे विविध कृषीविषयक योजना वा प्रकल्प राबवणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी वा विविध सामाजिक संघटनेद्वारे मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागेचा शेतकरी लाभासाठी उपयोग होणेबाबत एखादी योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

उमरगा (जि.उस्मानाबाद) येथील तालुका बीज गुणन केंद्राची एकूण १२३.७० एकर (सुमारे ४९ हेक्टर) जमिन आहे. त्यापैकी वहितीखालील एकूण जमिन ८५.८८ एकर एवढी असून इमारतीखालील १५ एकर, रस्तेखालील ६.१२ एकर आणि तालुका फळरोप वाटीकासाठी १६.७० एकर अशी एकूण १२३.७० एकर जमिन आहे.

(२) हे खरे नाही.

उमरगा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या लाभाकरीता विविध कृषि विषयक योजना वा प्रकल्प राबविण्याबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी अथवा सामाजिक संघटना यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) उमरगा येथील तालुका बीज गुणन केंद्राच्या प्रक्षेत्रावर वहितीखालील जमिनीवर बिजोत्पादन कार्यक्रम व कलमे / रोपे तयार करणे इ. कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच, सदर प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिके, शेतीशाळा, शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण, निंबोळी पावडर युनिट, गांडुळखत उत्पादन इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सर्पदंशाने मृत्यू टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत

**(१२) १०२५१७ (२७-१२-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्पदंशाने मृत्यू टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीं (चाळीसगाव) यांनी मा.कृषी मंत्री यांना दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सर्पदंशाने मृत्यू टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सर्पदंशाने मृत्यू टाळण्यासाठी कृषि विभागामार्फत कोणत्याही प्रकारची उपाययोजना करण्यात येत नाही, तथापि, शेतात काम करीत असताना शेतकऱ्यांस सर्पदंश अथवा विंचुदंश होवून त्याचा मृत्यु झाल्यास, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत सदर शेतकऱ्यास रु.२.०० लाख इतकी नुकसान भरपाई अनुज्ञेय आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सालबर्डी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत**

**(१३) १०२९७८ (२९-१२-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालबर्डी, (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत घोषणा केली होती परंतु, चाळीसगांव परिसरात शासकीय जमीन उपलब्ध नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या ४० वर्षात राज्यात एकही पशुवैद्यकीय महाविद्यालय मंजूर झालेले नसल्याने सध्या कार्यरत असलेल्या पशुवैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागते, हे खरे आहे काय,

(३) तसेच, सालबर्डी (ता.मुक्ताईनगर) येथील ग्रामपंचायतीच्या मालकीची कृषि महाविद्यालयास देण्यात आलेल्या ८० एकर जागेपैकी शिल्लक जागा पशुवैद्यकीय महाविद्यालयास उपलब्ध होऊ शकेल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी तातडीने निर्णय घेवुन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सन २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये नाशिक विभागात जळगांव जिल्हयामध्ये नविन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा केली आहे.

सदर महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी जळगांव जिल्हयातील तीन ठिकाणच्या जमिन उपलब्धतेची माहिती प्राप्त झाली असून सदर महाविद्यालयासाठी जागा निश्चितीची कार्यवाही सुरु आहे. जागा निश्चिती झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(२) हे खरे नाही.

सध्या राज्यात एकूण ५ पदवी पशुवैद्यकीय महाविद्यालये व १ पदव्युत्तर शिक्षण संस्था कार्यरत असून यापैकी सातारा जिल्हयातील शिरवळ व लातूर जिल्हयातील उदगीर येथील महाविद्यालये ३० वर्षापूर्वी मंजूर करण्यात आलेली आहेत. महाराष्ट्र राज्य कृषि संशोधन व शिक्षण परिषदेने राज्यात चार विभाग विहीत केले असून त्यानुसार राज्यातील प्रत्येक विभागामध्ये पशुवैद्यकीय महाविद्यालये कार्यरत आहेत. प्रत्येक महाविद्यालयात संबंधीत भागातील ७०% टक्के आणि महाराष्ट्र स्तरावरील ३०% टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

(३) याबाबत कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही.

(४) सदर नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी जळगांव जिल्हयामधील जागा निश्चित करण्याची कार्यवाही सुरु असून जागा निश्चितीनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

### दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध खरेदी दरात वाढ मिळण्याबाबत

**(१४) १०४२७९ (०५-०१-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दूध खरेदीवरून राज्यातील सहकारी दूध संघ आणि शासनामध्ये निर्माण झालेला पेच अद्यापही मिटला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दूध संघावरील कारवाईबाबत शासनाने कोणताच निर्णय जाहीर न केल्याने दूध सहकारी संघ दूध बंद आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे ही खरे नाही.
(३) दिनांक २०.०७.२०१८, ३१.०७.२०१८ व २१.०८.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील दूध व दूध भुकटी निर्यातीस प्रोत्साहनपर अनुदान व दूध उत्पादक शेतक-यांना दूध खरेदी दरात वाढ मिळणेकरिता निर्णय घेण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने योजनाची अमलबजावणी दिनांक ०१.०८.२०१८ पासून सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कृषी विभागाच्या अखत्यारित औरंगाबाद, अमरावती, पुणे, ठाणे येथे कीटकनाशके तपासणी प्रयोगशाळा उभारण्याबाबत

**(१५) १०४९४१ (०१-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी विभागाच्या अखत्यारित औरंगाबाद, अमरावती, पुणे, ठाणे येथे कीटकनाशके तपासणी प्रयोगशाळा उभारण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मनुष्यबळा अभावी प्रयोगशाळेत २५०० ते ३००० नमुन्यांची तपासणी वर्षभरात होते, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विश्लेषकांची पदे वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०९-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

सदर प्रयोगशाळांची मिळून एकूण वार्षिक तपासणी क्षमता ६२०० नमुने इतकी आहे. सन २०१७-१८ मध्ये ७०१९ इतके नमूने तपासण्यात आलेले आहेत. सदर प्रयोगशाळांमध्ये एकूण ५२ पदे मंजूर असून ४३ पदे भरलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किटकनाशकांच्या विषबाधेचा अहवाल अधिकाऱ्यांनी वरिष्ठ पातळीवर सादर न केल्याबाबत**

**(१६) १०६०१० (०१-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कीटकनाशकांच्या दाहकतेचे शेतक-यांना जीव घेणे चटके लागत असल्याचे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लक्षात आल्यानंतरही अधिका-यांनी शासनाला काहीच कळविले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृह, कृषी, सार्वजनिक आरोग्य, ग्रामविकास व वन विभागाच्या अधिका-यांनी विषबाधेचा अहवाल वरिष्ठ पातळीवर सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) कृषि विभागाच्या दिनांक १६/०५/१९८० च्या अधिसूचनेमध्ये किटकनाशकांच्या फवारणीमुळे होणाऱ्या विषबाधेप्रकरणी शासनास कळविण्याची जबाबदारी गृह विभाग, सार्वजनिक आरोग्य, ग्रामविकास व वन विभाग या विभागाच्या अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आलेली होती. परंतु, अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने शासनास कळविलेले नाही. कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदर घटनेनंतर शासनास अहवाल सादर केलेले आहेत.

(३) दिनांक १६/०५/१९८० च्या अधिसूचनेमधील तरतूदीनुसार कार्यवाही न केलेल्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन अहवाल सादर करण्यास संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दिनांक ८ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. कृषि विभागाशी संबंधित सर्व अधिकाऱ्यांची विभागीय कृषि सहसंचालक यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(४) सर्व संबंधित विभागांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी आढळून येणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एसटी कामगारांच्या वेतनवाढीबाबत**

**(१७) १०६२२७ (०१-०४-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एसटी कामगारांच्या वेतनवाढीबाबत माहे नोव्हेंबर-२०१७ मध्ये वा त्यादरम्यान संप पुकारल्यानंतर उच्च न्यायालयाने एसटी कामगारांचा हा संप बेकायदा ठरवत कामगारांना तात्काळ कामावर रुजू होण्याचा आदेश दिले होते, सरकार व कामगार यांच्यामधील वाद सोडविण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी कामगारांच्या वेतनवाढीसंदर्भातील प्रश्न सोडविण्यास सरकारने उच्चस्तरीय समिती नियुक्त केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील समितीने एसटी कामगारांच्या वेतनवाढीसंदर्भातील अहवाल शासनास सादर केला आहे हे ही खरे आहे काय,

(४) सदरील अहवालाच्या अनुषंगाने एसटी कामगारांच्या वेतनवाढीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१८-०९-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) अहवाल मा.न्यायालयात सादर करण्यात आला आहे.

(४) राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांचा कामगार करार व त्याअनुषंगाने वेतनवाढीचा प्रस्ताव महामंडळ स्तरावर प्रलंबित आहे.

राज्य परिवहन प्रशासनाने मान्यताप्राप्त संघटनेबरोबर वेळोवेळी करारातील मागण्यांवर चर्चा करुनही तोडगा निघाला नाही. त्यामुळे दि.०२.०४.२०१८ रोजी मा. परिवहन मंत्री तथा अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांनी सर्व श्रमिक संघटनांची एकत्रित बैठक घेतली होती, सदर बैठकीत मान्यताप्राप्त संघटनेने दि.०१.०५.२०१८ पर्यत वेळोवेळी झालेल्या चर्चेअंती दिलेल्या देकारास/ करारास सहमती न दिल्यास प्रशासन एकतर्फी वेतनवाढ जाहीर करेल, असे निर्देश देण्यात आले. राज्यात पोट निवडणूकीच्या आचारसंहितेमुळे दि.०१.०५.२०१८ रोजी वेतनवाढ जाहीर करता आली नाही. मान्यताप्राप्त संघटनेने सहमती न दिल्याने दि.०१.०६.२०१८ रोजी मा.परिवहन मंत्री तथा अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांनी २०१६-२०२० या कालावधीसाठी रु.४८४९ कोटीचे वेतनवाढ पॅकेज जाहीर केले. केवळ भत्ते वाढ झाली हे सत्य नसून या वेतनवाढीच्या अनुषंगाने महामंडळाच्या दि.०५.०६.२०१८ रोजीच्या परिपत्रकांन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. या परिपत्रकानुसार ज्या कर्मचाऱ्यांना वेतनवाढ मान्य नसेल, त्यांनी दि.०९.०६.२०१८ पर्यत प्रशासनास लेखी अर्जाद्वारे कळवावे, अश्या सुचना प्रसारित केल्या. त्याचबरोबर वरीलप्रमाणे जाहीर केलेली वेतनवाढ मान्य नसलेल्या केवळ कनिष्ठ वेतनश्रेणीतील कामगारांनी राज्य औद्योगिक न्यायाधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या दाव्याच्या निकालास अनुसरुन वेतनवाढ घ्यावी किंवा राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेचा राजीनामा देण्याची मुभा असेल, अशा कामगारांना चालकांची प्रतिमाह रु.२०,०००/- व वाहकांची प्रतिमाह रु.१९,०००/- इतक्या मानधनावर ५ वर्षासाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती केली जाईल व त्यांना प्रतिवर्षी रु.२००/- वेतनवाढ देण्यात येईल, असे विकल्प देण्याचा निर्णय महामंडळाद्वारे घेण्यात आला आहे.

राज्य परिवहन महामंडळात दर चार वर्षानी वेतन करार करण्यात येतो. करारानुसार वेतनवाढ व भत्ते दिले जातात. राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना वेतन आयोग लागू केला जात नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील राज्य परिवहन मंडळाच्या बस फेऱ्या सुरु करण्याबाबत**

**(१८) १०६६४९ (०१-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील राज्य परिवहन मंडळाच्या बससेवेच्या कपात केलेल्या फेऱ्या पूर्ववत सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि ८ सप्टेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री परिवहन यांचेकडे निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती नाशिक शहरातील शालेय विद्यार्थी, कामगार व प्रवाशांचे बस सेवेअभावी होणारा त्रास दूर करण्यासाठी बससेवेच्या फेऱ्या पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२६-०९-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) नाशिक शहरात बससेवा चालविण्याची जबाबदारी ही नाशिक महानगरपालिकेची आहे. तथापि, नाशिक महानगरपालिकेने शहर बस सेवा सुरु करेपर्यंत राज्य परिवहन महामंडळाद्वारा दि.१५.०६.२०१७ पासून नाशिक शहर वाहतूकीची १० नियते, १६० फेऱ्या, २०१५ कि.मी. चालविण्यात येत असून, भगूर ते महात्मानगर अशी फेरी सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तळेगाव दिघे (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथे डाळिंब बागेस औषधांची फवारणी करताना मृत्यू झालेल्या शेतकऱ्याच्या कुटुबीयांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१९) १०६८५४ (०१-०४-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव दिघे (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथे डाळिंब बागेस औषध फवारणी दरम्यान श्री.लक्ष्मण भिकाजी दिघे या शेतकऱ्यांच्या पोटात विषारी औषध गेल्याने त्यांच्या दुर्दैवी मृत्यू झाल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती संबंधित शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०९-२०१८) :** (१) लक्ष्मण भिकाजी दिघे, रा. तळेगाव दिघे हे डाळीबांचे पिकास फवारणी करीत असताना एस.टी.पी. पंपाचा पाईप प्रेशरने अचानक फुटल्याने त्यांचे तोंडावर व अंगावर विषारी औषध उडाल्याने त्यांना उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आलेले होते. तथापि, उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे.
(२) होय.

(३) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत सदर शेतकऱ्यांच्या वारसांना नुकसान भरपाई मिळवून देण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्रिय कीटनाशक मंडळ व नोंदणी समितीकडून शिफारस केलेल्या कीटकनाशकांचाच वापर शेतक-यांनी करण्याबाबत**

**(२०) १०७७५८ (०१-०४-२०१८). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे केंदीय किटकनाशक मंडळाने प्रमाणित न केलेली अनधिकृत किटनाशके शेतक-यांनी फवारल्यामुळे शेतमंजुराचा मृत्यू झाल्याची माहिती राज्य सरकारच्या कृषी तज्ज्ञांनी केलेल्या निरिक्षणातून पुढे आली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रिय किटकनाशक मंडळ व नोंदणी समितीकडून (सीआबी ॲन्डव आरसी) शिफारस केलेल्या किटकनाशकांचा वापर शेतक-यांनी करावा यासाठी राज्य सरकारकडून स्वतंत्र धोरण तयार केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती उक्त धोरण अंमलात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यांस, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३)किटकनाशक कायदा केंद्र शासनाचा असल्यामुळे, राज्य शासनास त्यामध्ये बदल करण्याचा कोणताही अधिकार नाही. तरी, दिनांक २७ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रान्वये, Extremely toxic (Red Triangle) गटात मोडणाऱ्या व किटकनाशके विषबाधेस कारणीभूत किटकनाशकांवर तसेच, ज्या किटकनाशकांच्या विषबाधेसाठी विशिष्ट प्रतिविष (Antidotes) उपलब्ध नाहीत व त्यांच्यामुळे विषबाधा झाल्यास केवळ लक्षणाच्या आधारे उपचार करण्याची शिफारस आहे, अशा किटकनाशकांवर कायमस्वरुपी बंदी घालण्याची विनंती केंद्र शासनास करण्यात आलेली आहे.

बिगर नोंदणीकृत पिकवाढ संजिवके व इतर उत्पादने शासन परवानाधारक दुकानांमधून विक्री करण्यास प्रतिबंध घालण्यात आलेला आहे.

तसेच, केंद्रीय किटकनाशके मंडळ व नोंदणी समिती, फरिदाबाद यांनी शिफारस केलेल्या किटकनाशकांचा वापर शेतकऱ्यांनी करावा यासाठी क्षेत्रीयस्तरावर व्यापक स्वरुपात प्रचार व

प्रसिध्दी विविध माध्यमांद्वारे करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कृषी विभागातील कर्मचारी, किटकनाशके उत्पादक/वितरक,कंपन्यांचे प्रतिनिधी,शेतकरी शेतमजूर यांच्या एकत्रित कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत.

सदर कार्यशाळेमध्ये कृषी विद्यापीठ,कृषी विज्ञान केंद्र यांचेकडील शास्त्रज्ञ,किटकनाशक कंपन्यांचे तज्ञ,कृषी विभागाचे अधिकारी यांचेकडून कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करण्यात येत आहे. सदर कार्यशाळा खरीप हंगाम सुरु होण्यापूर्वी एप्रील,२०१८ ते जून,२०१८ दरम्यान घेण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील भंडारा जिल्हयातील वैनगंगा नदीचे प्रवाहात वाहून जाणाऱ्या सुपीक जमिनीचा शेतकऱ्यास मोबदला मिळणेबाबत**

**(२१) १०८७१४ (०१-०४-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील वैनगंगा नदीच्या पात्रात पुराने वाहून जाणाऱ्या शेकडो एकर सुपीक शेतजमिनीचा मोबदला मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनीधीनी माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान महसुल मंत्री यांनी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती भंडारा जिल्हयातील वैनगंगा नदीचे पात्रात पुराने वाहून जाणाऱ्या शेकडो एकर सुपीक शेतजमिनीचे मोबदला मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०९-२०१८) :** (१) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही.

(२) व (३) जून ते सप्टेंबर २०१३ मधील अतिवृष्टी व पुरामुळे तुमसर तालुक्यातील रेंगेपार, पांजरा, कोष्टी, बोरी व उमरवाडा गावामधील वैनगंगा नदीच्या पात्रात शेतजमीन वाहून गेलेल्या ९८ खातेदारांना रु. २,९९,१३३/- इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर, यवतमाळ जिल्हयात शेतांमधील कीटकनाशक फवारणींमुळे विषबाधा झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत**

**(२२) ११०४८१ (०१-०४-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर),**

**श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: कोल्हापूर, यवतमाळ जिल्हयात ६ महिन्यांमध्ये शेतातील किटकनाशक फवारणींमुळे ६१ शेतकऱ्यांचा बळी गेला तसेच २ हजार ७८७ शेतकऱ्यांना विषबाधा झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शासनाने याप्रकरणी किटकनाशक कंपन्यांवर कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती याप्रकरणी मृत शेतकरी तसेच विषबाधा झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०९-२०१८) :** (१) होय.

राज्यात किटकनाशक फवारणीमुळे यवतमाळ २१, अकोला ९, बुलढाणा २, अमरावती २, वर्धा १, नागपूर ७, चंद्रपूर ४, भंडारा ३, गडचिरोली ३, धुळे १, नंदुरबार १, जळगाव २, नांदेड ४, अहमदनगर १ व सोलापूर २ याप्रमाणे एकूण ६३ शेतमजूर/ शेतकरी यांचे मृत्यू झालेले आहेत. तसेच, २,७८७ विषबाधीत झालेले आहेत.

(२) नाही.

(३) किटकनाशक कायदा, १९६८ व किटकनाशक नियम, १९७१ अन्वये किटकनाशके उत्पादक व विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच, भारतीय दंड संहिता, १८६० मधील ३०४-A अंतर्गत यवतमाळ जिल्हयात मे. युपीएल लि. उत्पादकावर व दोन किटकनाशके विक्रेत्यांवर त्यांचे मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के एस एल या किटकनाशकांच्या अनुषंगाने गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत. मे. घरडा केमिकल्स या किटकनाशक उत्पादकासह एकूण आठ विक्रेत्यांवर किटकनाशके कायदा, १९६८ व किटकनाशके नियम, १९७१ मधील कलम व नियमांचे उल्लंघन झाल्याने त्यांच्यावर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

राज्यात किटकनाशक विषबाधा प्रकरणी मृत्यू झालेल्या ६३ शेतमजूर/ शेतकऱ्यांना प्रत्येकी एकसमान रु. ४.०० लाख प्रमाणे आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून मदत वाटपाबाबत कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे मंचर (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील एस.टी.बस आगार सुरु करण्याबाबत

**(२३) ११०९७६ (०१-०४-२०१८). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मंचर (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील आगाराचे काम पूर्ण झाले असुनही कर्मचा-यांअभावी आगार सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती मंचर येथील एस.टी.बस आगारात कर्मचारीची भरती करुन आगाराचे काम सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२६-०९-२०१८) :** (१) नाही.
(२) व (३) सद्यस्थितीत राज्य परिवहन महामंडळाचा प्रशासकीय खर्च कमी करण्याच्या दृष्टीकोनातून ३० कि.मी. परिसरात कार्यान्वित असलेल्या आगारांचे सुसूत्रिकरण/एकत्रिकरण करण्याबाबत नियोजन करण्यात येत असल्याने, मंचर आगार कार्यान्वित न करण्याचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाद्वारे घेण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्याला पूर्णवेळ परिवहन आयुक्त पद नियुक्त करण्याबाबत

**(२४) ११११७२ (०१-०४-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने परिवहन खात्याचा कारभार दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यादरम्यान ऑनलाईन प्रणालीद्वारे सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रणालीतील त्रुटींमुळे वाहतूकदारांना तसेच नागरिकांना गेल्या दोन महिन्यापासून त्रास सहन करावा लागत आहे, राज्यातील सर्व राज्य परिवहन कार्यालयात कामाचे प्रमाण वाढले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात मागील वर्षापासून परिवहन आयुक्तपदी रिक्त असल्याने धोरणात्मक निर्णयेप्रक्रियेत विलंब होण्याबरोबरच इतर अडचणी निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्याला पूर्णवेळ परिवहन आयुक्तांची नियुक्ती करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य माल व प्रवासी वाहतूक संघटनेने केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती राज्याला पूर्णवेळ परिवहन आयुक्त पद नियुक्त करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय सूचना केंद्र यांनी विकसीत केलेल्या सारथी-४ व वाहन-४ या संगणक प्रणालीचा राज्यात वापर सुरु असून त्यामध्ये उद्भवणाऱ्यातांत्रिक अडचणींचे राष्ट्रीय सूचना केंद्रामार्फत तात्काळ निरसन करण्यात येते. ऑनलाईन प्रणालीमुळे अर्जदार स्वतःचा अर्ज, शुल्क भरणे इत्यादी कामे ऑनलाईन पद्धतीने करीत असल्यामुळे परिवहन कार्यालयांमधील कामाचे प्रमाण त्यामानाने कमी झाले आहे.
(३) परिवहन आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार प्रधान सचिव (परिवहन) यांना देण्यात आला होता त्यामुळे कोणतीही अडचण निर्माण झाली नाही.
(४) नाही.
(५) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १३.०४.२०१८ रोजीच्या आदेशान्वये परिवहन आयुक्त पदावर पूर्णवेळ अधिका-यांची नियुक्ती केली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाने सहायक वाहतूक अधिक्षक व वाहतूक निरिक्षक या पदांसाठी घेतलेल्या परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेत झालेला गैरप्रकार**

**(२५) ११२५९५ (०४-०४-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळाने माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान सहायक वाहतुक अधिक्षक व वाहतुक निरिक्षक या १७३ पदांसाठी २९ ऑक्टोंबरला घेतलेल्या परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील चुकांमुळे कमी गुण मिळाल्याची तक्रार परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी केली असल्याचे माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती प्रश्नपत्रिकेत चुका असल्याने विदयार्थ्यांचे झालेले नुकसान भरुन देण्यासह जबाबदार असणा-यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२४-०९-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) सदर पदांच्या भरतीप्रक्रीयेसाठी महामंडळाद्वारे मे.यु.एस.टेक्नॉलॉजी इंटरनॅशनल प्रा.लि. या बाह्य संस्थेची निवड करण्यात आली आहे, सदर संस्थेमार्फत दि.२९.१.२०१७ रोजी ऑनलाईन परिक्षा घेण्यात आली होती. तद्नंतर, दि.०६ ते ०८ डिसेंबर, २०१७ या तीन दिवसांमध्ये परिक्षार्थी विदयार्थ्यांसाठी उत्तरपत्रिका व उत्तरतालिका संबंधित वेबसाईटवर स्वत: तपासून घेण्यासाठी अवधी देण्यात आला व उमेदवारांना ई-मेल आयडीवर बाह्य संस्थेमार्फत तक्रारी नोंदविण्यास सांगण्यात आले. त्यानुसार ४ परिक्षार्थी विदयार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची छाननी करुन निराकरण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील पुरबाधित पुनर्वसित गावांतील नागरिकांना सोयी-सुविध देण्याबाबत

**(२६) ११३०८३ (०१-०४-२०१८). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील नदीकाठावरील पुनर्वसित २० गांवे विकासापासून वंचित राहिली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात ५२ गांवे असुन ४५ ग्रामपंचायती आहे सन १९७० ते १९८२ या काळात अतिवृष्टीमुळे नदीकाठच्या गावांना धोका निर्माण झाल्याने या गावांचे पुनर्वसन करण्यात आले परंतु सोयी सुविधांच्या अभावामुळे तेथील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांना सोयी-सुविध देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही. धर्माबाद तालुक्यातील पूर बाधित पुनर्वसित गावांत पुनर्वसन धोरणानुसार देय नागरी सुविधा यापूर्वीच पुरविण्यात आल्या आहेत.

(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांना आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत

**(२७) ११३२१३ (०१-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय दिनांक १६ मे,२०१७ रोजी वा त्यासुमारास आयोजित करण्यात आलेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला व त्याअनुषंगाने सदर योजना लागू न झाल्यामुळे लोकप्रतिनीधी यांनी मा.पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री यांना दिनांक २० डिसेंबर,२०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिकारी व कर्मचारी यांना सेवांर्तगत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उक्त अधिकारी व कर्मचारी यांना सेवांर्तगत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-०९-२०१८) :** (१) निवेदन प्राप्त झाले आहे, तथापी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठामधील अधिकारी व कर्मचारी यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याच्या प्रस्तावावर मंत्रीमंडळाच्या बैठकीत अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही.

(२) व (३) सदर अधिकारी व कर्मचारी यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला येथील पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय स्थापन करण्याबाबत**

**(२८) ११५०४६ (०१-०४-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व)** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय शासनाने मंजूर करून २ वर्षाचा कालावधी उलटून सुद्धा विद्यापीठाकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पदवी महाविद्यालय करिता स्थानिक कृषी विद्यापीठाची जागा उपलब्ध करण्यासाठी संयुक्त पाहणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पदवी महाविद्यालयासाठी सदर विद्यापीठाचे निकषानुसार आवश्यक जमीन सदर महाविद्यालयाकडे उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती सदर महाविद्यालयाचे पदवी प्रवेश येत्या २०१८-२०१९ शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय अकोला येथे नविन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची मा. मंत्री (वित्त) यांना अर्थसंकल्पिय भाषणामध्ये केली आहे. त्यानुसार सदर महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी आवश्यकती जागा विहीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय.

कुलसचिव, पंदेकृवि, अकोला यांनी मध्यवर्ती संशोधन केंद्र, हायवे ब्लॉक, बाभुळगांव येथील जमिन हंस्तांतरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात आल्याचे कळले असून विण्यात आल्याने महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ समितीव्दारे बाभूळगांव येथे प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली व सदर जमिन नविन महाविद्यालय स्थापनेकरीता योग्य असल्याचा अहवाल सादर केला आहे.

(३) हे खरे नाही.

भारतीय पशुचिकित्सा परिषद नवी दिल्ली यांचे मानकानुसार महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर अंतर्गत स्ना. पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला येथे नवीन पदवी महाविद्यालय स्थापनेसाठी जागा उपलब्ध नाही.

(४) व (५) सदर नविन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापनेसाठी जागा हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. जागा हस्तांतरीत झाल्यानंतर व आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध झाल्यानंतर प्रवेशाची कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे येथे गो-शाळांचा विकासाचा कार्यक्रम आखण्याबाबतची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(२९) ११६१५४ (०१-०४-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथे गो-शाळांचा विकास येत्या तीन वर्षाच्या काळात करण्यात येणार असल्याचे जाहिर घोषणा पशुसंवर्धन मंत्री यांनी दि.८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास कार्यक्रमादरम्यान करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घोषणेनुसार गो-शाळांचा विकासाचा कार्यक्रम आखण्यात आला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, चौकशीअंती गो-शाळांचा विकासाचा कार्यक्रम आखण्याबाबतची शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) राज्यातील गोवंशाचे रक्षण करणे, त्यांचा सांभाळ करणे तसेच गोवंशावर संशोधन करणे यासाठी राज्यात “गोवर्धन गोवंश सेवा केंद्र” ही नवीन योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता ३४ ग्रामीण

जिल्हयात राबविण्यासाठी प्रत्येक जिल्हयाकरिता एकवेळचे रु.१.०० कोटी अनुदान देण्याचा निर्णय दि.२६.४.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

"गोवर्धन गोवंश सेवा केंद्र" या नवीन राज्यस्तरीय योजनेअंतर्गत निवड झालेल्या लाभार्थी संस्थांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी एकवेळचे रु.१.०० कोटी अनुदान चार टप्प्यामध्ये मंजूर करण्यास मान्यता प्रदान करुन सदर चार टप्प्यापैकी पहिल्या टप्प्याचे प्रत्येक संस्थेस रु.२५.०० लक्ष (अक्षर रु.पंचवीस लक्ष) एवढे अनुदान असे एकूण २१ लाभार्थी संस्थांना एकूण रु.५२५.००० लक्ष (अक्षर रु.पाच कोटी पंचवीस लक्ष फक्त) अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच दि.४ मे,२०१८रोजीच्या शासन निर्णयान्वये १३ संस्थांना अनुदान देण्यासाठी निवड करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परिवहन विभागातील आयुक्त श्री.प्रवीण गेडाम यांच्या गैरकारभाराच्या चौकशीच्या आदेशाबाबत**

**(३०) ११६२६८ (०१-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या परिवहन विभागात आयुक्त पदावर कार्यरत असताना तत्कालीन आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या गैरकारभाराच्या चौकशीचे आदेश राष्ट्रपती कार्यालयाने माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एसटी महामंडळाच्या महामार्गाजवळ असलेल्या दुकानात तिकीट दाखवून उपहार मिळण्याबाबत**

**(३१) ११६७९४ (२३-०७-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटी महामंडळाच्या महामार्गाजवळ असलेल्या दुकानात एसटीची तिकीटे दाखवून ३० रुपयात नाश्ता मिळण्याची योजना सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेत महामार्गावरील हॉटेल मालकांकडून प्रवाशांना ३० रुपयात अर्धा कप चहा आणि अपुरा नाश्ता मिळत असून हॉटेल मालकांवर महामंडळाचे नियंत्रण नसल्यामुळे पैसे देऊनही प्रवाशांना अपुरा नास्ता मिळत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन प्रवाशांची फसवणूक करणाऱ्या हॉटेल मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२६-०९-२०१८) :** (१), (२) व (३) राज्य परिवहन प्रवाशांकरिता रु.३०/- मध्ये चहा व नाश्त्याची सोय यामध्ये दोन नग बटाटेवडे, दोन नग मेदूवडे, उपमा, शिरा, पोहे यापैकी एक याचा समावेश असून, राज्य परिवहन महामंडळाने नेमून दिलेल्या अधिकृत हॉटेल थांब्यावर उपलब्ध केली आहे.

यासंबंधी प्रवाशांकडून तक्रार प्राप्त झाल्यास, सदर तक्रारीमध्ये चौकशीअंती तथ्य आढळल्यास महामंडळामार्फत हॉटेल थांबा तात्काळ बंद करण्याबाबतच्या सूचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे मुंबई-पुणे मार्गावरील हॉटेल 'फुडमॉल', पुणे-भोर-महाड मार्गावरील हॉटेल 'आयुषा' तसेच पुणे-नाशिक मार्गावरील हॉटेल 'इंद्रप्रस्थ' यांनी प्रवाशांना रु.३०/- मध्ये चहा अधिक अल्पोपहार देण्याच्या अटीचे उल्लंघन केल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाद्वारे त्यांचा थांबा तात्काळ रद्द करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परिवहन विभागाने वाहनांना स्पीड गव्हर्नर बसवणे बंधनकारक केल्याबाबत**

**(३२) ११६८९२ (३१-०७-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या परिवहन विभागाने वाढत्या रस्ते अपघाताच्या पार्श्वभूमीवर वाहनांना स्पीड गव्हर्नर बसवणे बंधनकारक केल्याचे माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असुन स्पीड गव्हर्नरच्या उपयुक्तते विषयी राज्य सरकारने जनजागृती करावी अशा सूचना मा. उच्च न्यायालयाने शासनास दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने स्पीड गव्हर्नर लावणे बंधनकारक केले असले तरी याची योग्य प्रकारे तपासणे होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्पीड गव्हर्नरची तपासणी होण्याकरिता संबंधित विभागाला पुरेशी यंत्रसामुग्री व काटेकोर तपासणी होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०९-२०१८) :** (१) (२) व (३) केंद्र शासनाच्या दि.१५.०४.२०१५ च्या अधिसूचनेनुसार परिवहन संवर्गातील दुचाकी, तीन चाकी, अग्निशमक, रूग्णवाहिका, पोलिस

इ. वाहने वगळून अन्य सर्व वाहनांना वेग नियंत्रक बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. सदर अधिसूचनेच्या अंमलबजावणीबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दि.०१.०९.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सर्व क्षेत्रीय परिवहन कार्यालयांना सूचना जारी करण्यात आलेल्या आहेत.

जनहित याचिका क्र.८९/२०१७ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१०.०४.२०१८ रोजीच्या आदेशामध्ये परिवहन विभागाने वाहनांवर वेग नियंत्रक बसवले आहे किंवा नाही याबाबत कडक तपासणी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तद्नुषंगाने दि.२१.०४.२०१८ ते दि.३०.०४.२०१८ या कालावधीत वेग नियंत्रक तपासणी करण्यासाठी विशेष तपासणी मोहिम राबिवण्याबाबत व नियमित तपासणी करण्याकरीता परिवहन आयुक्त कार्यालयाव्दारा दि.२१.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय परिवहन कार्यालयांना सूचना जारी करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचगांव (ता.उमरेड, जि.नागपूर) जवळील पेंढरी गावातील गोशाळेतील जनावरांची चाऱ्याअभावी होत असलेली उपासमार**

**(३३) ११६९३२ (०१-०८-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचगांव ( ता.उमरेड,जि.नागपूर) जवळील पेंढरी गावातील गो-शाळेत जनावरांच्या आरोग्य आणि देखभालीकडे संस्थेचे दुर्लक्ष होत असल्याने कुपोषण, चारा व पाण्याअभावी ३५ गाई व इतर जनावरांचा मृत्यु झाल्याचे दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेंढरी येथील गो-शाळेत किती जनावरांची सोय करण्यात आली आहे, तसेच राज्यातील इतर जिल्हयामध्ये अशाप्रकारच्या किती गो-शाळा असून शासनाने त्यांना किती अनुदान दिले आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर संस्थेवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) पेंढरी येथील गोशाळेत २५० ते ३०० जनावरे सांभाळण्याची क्षमता असून सद्यस्थितीत १८९ जनावरांचे संगोपन करण्यात येते.

राज्यात अशा प्रकारच्या ५१८ पेक्षा जास्त संस्था असून शासनामार्फत “गोवर्धन गोवंश सेवा केंद्र” या राज्यस्तरीय योजनेतून ३४ संस्थांना प्रत्येकी १ कोटी अनुदान देण्यात येत आहे. या योजनेच्या निकषासाठी दिनांक २६.४.२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये अटी व शर्ती नमूद करण्यात आल्या आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाहनांची नोंदणी करण्याची तरतूद मोटर वाहन कायदयात समाविष्ट करण्याबाबत.**

**(३४) ११७१२२ (०१-०८-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये वाहतूक कोंडी व रस्त्यावर होणारे वाहनांचे पार्किंग यामुळे वाहन पार्किंगची जागा असल्याचा पुरावा दिला तरच वाहनांची नोंदणी करण्याची अट मोटार वाहन कायदयात समाविष्ट करण्याचे निर्देश मा. उच्च न्यायालयाने दिनांक १३ एप्रिल,२०१८ रोजी वा त्यासमुमारास केंद्र व राज्य सरकारला दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त तरतुदीचा मोटर वाहन कायदयात समावेश करण्यासह सुधारणा करणेबाबत शासनाने तातडीने अध्यादेश काढून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०९-२०१८) :** (१) व (२) जनहित याचिका क्र.६२/२०१४ मध्ये दि.१३ एप्रिल, २०१८ रोजीच्या आदेशात वाहन पार्किंगची जागा असल्याचा पुरावा दिला तरच वाहनांची नोंदणी करण्याची अट मोटार वाहन कायद्यात समाविष्ट करण्याबाबत विचार करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिलेले नाहीत. तथापि, सदर याचिकेतील त्यापुर्वीच्या दि.२९.०१.२०१८ रोजीच्या आदेशामध्ये वाहन नोंदणी करताना पार्किंग उपलब्धता असणेबाबत तपासणी करण्याबाबत शासनाचे धोरण आहे काय याबाबत न्यायालयास माहिती देण्याच्या सूचना मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आहेत.

मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत नियमात पार्किंग जागा नसल्यास वाहनाची नोंदणी नाकारण्याची तरतुद नाही. तथापि, राज्य परिवहन प्राधिकरणाच्या ठराव क्र.२८/९९ नुसार टुरिस्ट परवान्यावर वाहन चढवितांना सदर वाहनाच्या पार्किंगचा पुरावा मागण्याची तरतूद करण्यात येवून त्यानुसार कार्यवाही करण्यात येते. सदरची बाब न्यायालयाच्या निदर्शनासही आणण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौ.कळबंस्ते (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील खैरांची झाडे नियमबाहय तोडून परस्पर विक्री केल्याबाबत**

**(३५) ११७४४० (३१-०७-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.कळबंस्ते (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी ) येथील पशुसंवर्धन कार्यालयाच्या आवारातील ५ मोठी खैरांची झाडे तेथील अधिकारी डॉ.निमुणकर यांनी नियमबाहय तोडून त्याची परस्पर विक्री केल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्याअनुषंगाने सबंधीत दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१२-०९-२०१८) :** (१) होय हे खरे आहे,

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये डॉ.एस.एन.निमुणकर,पशुधन विकास अधिकारी यांनी कोणतीही परवानगी न घेता सधन कुक्कूट विकास गट,कळबंस्ते, ता. चिपळूण जि.रत्नागिरी येथील कुकूट परिक्षेत्रामधील ४ खैरांची मोठी झाडे बुंध्यापासून कापून त्यांची परस्पर विक्री केल्याचे आढळून आले आहे.

सदर अनियमितेतच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा रत्नागिरी यांच्या आदेशानुसार डॉ.निमुणकर यांची विभागीय चौकशी का करण्यात येवू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावणेत आली आहे. तसेच परिक्षेत्र वनअधिकारी,चिपळूण यांनी सदर प्रकरणी चौकशी करुन डॉ. निमुणकर यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक या पदाच्या भरतीमध्ये झालेला गैरप्रकार**

**(३६) ११७७३२ (३१-०७-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास**

**कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक या पदाच्या भरतीमध्ये माजी सैनिकांसाठी राखीव असलेल्या जागांवर बोगस उमेदवारांची शिफारस करण्यात आल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शासकीय पदांवरील भरतीसाठी परीक्षा घेण्यात येत असुन परीक्षांमध्ये बोगस उमेदवार बसत असल्याचा गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी उमेदवारांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय पदांमधील भरतीसाठी घेण्यात आलेल्या परीक्षातील गैरप्रकाराबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०९-२०१८) :** (१) व (२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सहायक मोटार वाहन निरिक्षक परिक्षा, २०१७ मध्ये ८२१ उमेदवारांची कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहुन शिफारस केलेली आहे. त्यापैकी ५६ उमेदवार माजी सैनिक प्रवर्गातील असून, शिफारसपात्र सर्व उमेदवारांच्या अर्जांची व कागदपत्रांची तपशिलवार छाननी अद्याप बाकी आहे. शिफारसपात्र माजी सैनिक प्रवर्गाच्या उमेदवारांची नियुक्ती करण्यापुर्वी त्यांच्या माजी सैनिक असल्याच्या दाव्याची सखोल व काटेकोरपणे सत्यता पडताळण्यानंतरच या उमेदवारांना नियुक्ती देणे अपेक्षित आहे. त्यानुसार परिवहन आयुक्त स्तरावरुन आवश्यकती कार्यवाही सुरु आहे. दरम्यानच्या काळात मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी याचिका क्र.१२७०/२०१८ मध्ये सदर भरती प्रक्रियेस स्थगिती दिलेली आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात येणा-या परिक्षेमध्ये बोगस उमेदवार बसत असल्याच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर आयोगामार्फत उमेदवारांना दोन स्वतंत्र मूळ ओळखपत्रांच्या आधारे तपासणी करुन, परिक्षेस प्रवेस देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. या दोन्ही ओळखपत्रांच्या छायांकित प्रती व हजेरीपटावर डाव्या हाताच्या अंगठयाच्या ठसे परिक्षेच्या वेळी घेण्याची व काही महत्वांच्या परिक्षेमध्ये आधार क्रमांकावर आधारीत बायोमॅट्रीक पध्दतीने उपस्थितीत नोंदविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. परिक्षेमधील बोगस उमेदवारांबाबत आयोगातर्फे वेळोवेळी आवश्यक ती प्रतिबंधात्मक उपायायोजना व खबरदारी घेण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ओझर (ता.निफाड) लांब पल्ल्याच्या सर्व बसेसला अधिकृत थांबा देण्याबाबत

**(३७) ११७८४५ (२३-०७-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओझर (ता. निफाड) हे राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरील प्रमुख गाव असून येथे राज्य परिवहन महामंडळाच्या लांब पल्ल्याच्या सर्व बसेसला अधिकृत थांबा दिलेला असतांनाही सटाणा, साक्री, नंदुरबार, मालेगाव येथून येणाऱ्या लांब पल्ल्याच्या बसेस थांबत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रवाशांशी गैरवर्तन करणाऱ्या बसचालक आणि वाहकांवर कारवाई करण्यासह लांब पल्ल्याच्या सर्व बसेसना ओझर येथे थांबा घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२६-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

ओझर या ठिकाणी महामंडळाचे बसस्थानक असून, सदर बसस्थानकामध्ये लांब पल्ल्याच्या फेऱ्यांना थांबा देण्यात आलेला नाही.

(२) ओझर बसस्थानक येथे प्रवाशांशी गैरवर्तन करणाऱ्या चालक/वाहक यांच्याबाबत महामंडळाच्या नाशिक विभागास प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित चालक/वाहक यांच्या कामगिरीत बदल करण्यात आलेला आहे.

ओझर या ठिकाणी लांबपल्ला फेऱ्या वगळता नाशिक विभागातील सर्वसाधारण फेऱ्यांना अधिकृत थांबा देण्यात आलेला असून, सदर फेऱ्यांची नोंद वाहतूक नियंत्रक नोंदवहीमध्ये करण्याबाबतच्या सक्त सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मिळण्याबाबत

**(३८) ११७९७९ (०१-०८-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचा सामना करीत असुन शासनाने अधिसूचित क्षेत्रातील पिकांसाठी प्रधानमंत्री पिकविमा योजना राबविली असुन ही योजना कर्जदार शेतक-यांना बंधनकारक तर कर्ज न घेतलेल्या शेतकऱ्यांना ऐच्छिक असे या पिकविमा योजनेत असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीक विमा योजनेत सहभागी झालेल्या ९ लाख ६६ हजार अर्जदार विमा मंजुरीच्या प्रतीक्षेत असुन चार वर्षापासून दुष्काळी स्थिती असल्यामुळे शेतक-यांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नांदेड जिल्हयात पीक विम्याचे ४ हजार ८०० ऑफलाईनचे अर्ज सेतू केंद्राच्या माध्यमातून भरण्यात आल्याचे दि. २५ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असुन अर्जाची छाननी, पैसे कधी भरायचे इ. माहिती जिल्हाधिकारी कार्यालयांकडून शेतक-यांना देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पीक विमा योजनेत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मिळण्यासह पीक विम्यासंदर्भातील माहिती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-१०-२०१८) :** (१) प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०१६ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. सदर योजना कर्जदार शेतकऱ्यांना बंधनकारक तर बीगर कर्जदारांना ऐच्छिक आहे. खरीप हंगाम २०१७ मध्ये नांदेड जिल्हयातील १०.४० लाख शेतकऱ्यांनी योजनेत सहभाग घेतला आहे. त्यापैकी कर्जदार शेतकरी १.१३ लाख व बिगर कर्जदार शेतकरी ९.२७ लाख इतके आहेत.

(२) प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०१७ अंतर्गत नांदेड जिल्हयातील १०.४० लाख शेतकऱ्यांनी योजनेत सहभाग घेतला आहे. विमा कंपनीमार्फत प्राप्त अंतरिम अहवालानुसार जिल्हयातील ७.४३ लाख शेतकऱ्यांना रु. ५४२.७९ कोटी नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०१७ अंतर्गत नांदेड जिल्हयातील दिनांक ०५ ऑगस्ट, २०१७ रोजी सीएससी केंद्रामार्फत (Common Service Centre) ऑफलाईन पध्दतीने ३६५१ अर्ज स्विकारण्यात आले असून सदर अर्जाच्या अनुषंगाने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुर्ला नेहरू नगर येथे एस टी महामंडळाच्या शिवशाही बस अग्निशमन यंत्रणेअभावी पडून असल्याबाबत

**(३९) ११८९६६ (२४-०७-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला नेहरू नगर येथे एस टी महामंडळाच्या कंत्राटी २५ शिवशाही बस अग्निशमन यंत्रणेअभावी पडून असल्याचे माहे मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करारानुसार कंत्राटदाराने अटींची पूर्तता न केल्यामुळे नवीन शिवशाही बसेस कुर्ला नेहरुनगर येथे उभ्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन करार भंग करणाऱ्या खाजगी कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

कुर्ला नेहरुनगर येथे उभ्या असलेल्या २१ बसेस महामंडळात चालनात आणणेपुर्वी तांत्रिक पुर्ततेकरिता कुर्ला येथे संबंधित पुरवठादारामार्फत उभ्या करण्यात आलेल्या होत्या. तांत्रिक पुर्ततेनंतर सदर बसेस चालनात आलेल्या आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) आगारात लांब पल्ल्याच्या एस.टी.बस फेऱ्या बंद असल्याबाबत**

**(४०) ११९०७६ (२३-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) आगार येथे राज्य परिवहन महामंडळाचे जवळपास ४२० शेड्यूल असून लांब पल्याच्या बस फे-या वेळेवर न सोडल्याने तसेच बस फे-याचे नियोजन नियमित नसल्यामुळे प्रवासी त्रस्त होऊन महामंडळाच्या उत्पन्नात घट झाल्याचे दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा आगारास ५० पेक्षा अधिक खेडे जोडलेली असून ग्रामीण भागातील ९० बसफे-या वेळेवर सुटत नसल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी व प्रवाशांची गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, आगारात घाणीचे साम्राज्य असून व्यावसायिकांनीही भाडेतत्वावर दिलेल्या जागेपेक्षा जास्त जागेचा वापर करण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मेहकर आगारात बस फे-याचे नियोजन नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२६-०९-२०१८) :** (१) नाही.

मेहकर (जि.बुलढाणा) आगारामार्फत माहे मार्च, २०१८ मध्ये ७३ शेडयुलद्वारे ७५८ फेऱ्या व मानव विकास अंतर्गत २२ फेऱ्यांद्वारे वाहतूक चालनात आहे. लांब पल्ल्याच्या व इतर बस फेऱ्यांचे नियोजन करण्यात येत असून, सदर फेऱ्या वक्तशीरपणे सोडण्यात येतात. तसेच महामंडळाच्या उत्पन्नात गतवर्षीपेक्षा वाढ झाली आहे.
(२) अंशत: खरे आहे.

बुलढाणा आगाराच्या कक्षेत ९८ गावे येत असून आगाराला ती जोडलेली आहेत. त्यामध्ये मेहकर आगारातील १२ व बुलढाणा आगारातील ११ गावांतील रस्त्यांची अवस्था खराब असल्यामुळे नियोजित वेळेपेक्षा जास्त वेळ बसेस पोहचण्यास लागत असल्याचे नाकारता येत

नाही. रस्ता दुरुस्तीबाबत कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बुलढाणा यांना पत्र देण्यात आले आहे.

(३) नाही.

मेहकर बस स्थानकाच्या साफ सफाईचे कामकाज ब्रिक्स इंडिया कंपनी, पुणे यांना माहे डिसेंबर, २०१७ पासून देण्यात आलेले आहे व त्यांच्याकडून आगाराची साफसफाई करुन घेतली जात आहे.

मेहेकर बसस्थानकावर असणाऱ्या विविध वस्तू भांडार या आस्थापनाधारकाने राज्य परिवहन महामंडळाच्या प्रचलित नियमानुसार मंजुरी घेतली असून त्यानुसार ते अतिरिक्त जागेचा वापर करीत आहे. इतर कोणतेही वाणिज्य आस्थापना परवानाधारक अतिरिक्त जागेचा वापर करत नाहीत.

(४) आगारातील फेऱ्यांचे नियोजन करुन फेऱ्या नियमित सोडणेबाबतच्या सूचना राज्य परिवहन महामंडळाद्वारे संबंधितांना देण्यात आल्या आहेत. त्या अन्वये बसेस नियमित व वेळेवर चालनात आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पासली ते बोरीवली पर्यंत सुरु असलेली एस.टी. बससैवा नियमित सुरु करण्याबाबत

**(४१) ११९०८९ (२३-०७-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाची पासली ते बोरीवली पर्यंत सुरु असलेली एस.टी. बस नियमित सुरु करण्याकरीता लोकप्रतिनिधींनी विभाग नियंत्रक, पुणे विभाग, पुणे यांना दि. १७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी करुन पासली ते बोरीवली पर्यंत एस.टी. बस नियमित सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२४-०९-२०१८) :** (१) होय.

सदरबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेद्वारे करण्यात आलेली आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे मागणीनुसार उन्हाळी गर्दीच्या हंगामामध्ये दि.०६.०५.२०१८ ते दि.१६.०५.२०१८ या कालावधीत पासली ते बोरीवली ही बसफेरी भोर आगारामार्फत चालविणेत आलेली आहे. परंतू, उन्हाळी गर्दीच्या हंगामामध्ये देखील त्या फेरीस प्रवासी प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदर फेरीचे सरासरी भारमान ४७% इतके अत्यल्प आलेले आहे, त्यामुळे सदरची फेरी तात्पूरती स्थगित ठेवणेत आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पानशेत धरण (जि.पुणे) येथील परिसरात जनावरांसाठी चारा व पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४२) ११९१९६ (३१-०७-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पानशेत धरण (जि.पुणे) येथील परिसरात पाण्याअभावी काही जनावरांचा मृत्यु झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरातील जंगलाला आग लागल्यामुळे चारा टंचाई निर्माण झाली असुन पाणवठे कोरडे पडले आहेत तसेच वाडया-वस्त्यांवरही भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असून जनावरांसाठी चारा व पाण्याची गैरसोय निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पानशेत धरण (जि.पुणे) येथील परिसरात जनावरांसाठी चारा व पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) वेल्हा तालुक्यातील एकूण २९,८६९ पशुधनास मे व जून, २०१८ या कालावधी करीता एकूण २०,२८० मे.टन हिरव्या चा-याची व ८,१०० मे.टन वाळलेल्या चा-याची आवश्यकता होती. या कालावधीत तालुक्यात सर्व मार्गाने मिळून १६,३०० मे.टन हिरवा चारा आणि ११,५६० वाळलेला चारा उपलब्ध होता.

वेल्हा तालुक्यातील सरासरी वार्षिक पर्जन्यमान २५८.८ मि.मि असून सन २०१७ मध्ये माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत एकूण २६०.३ मि.मि. इतका पाऊस झालेला आहे.

(३) वेल्हा तालुक्यातील लोकप्रतिनिधीकडून तसेच पशुपालकांकडून चारा व पाणी टंचाई असल्याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झालेली नाही. तसेच, चारा व पाणी याच्या अभावी पशुधनाचा मृत्यु झाल्याची कोणतीही घटना निदर्शनास आलेली नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात एसटीच्या ऑनलाइन बुकिंग रद्द केल्यास ऑनलाईन पैसे परत करण्याबाबत**

**(४३) ११९९१५ (२३-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एसटीच्या ऑनलाइन बुकिंगची सुविधा असून बुकिंग रद्द केल्यास ऑनलाईन पैसे परत करण्याची व्यवस्था उपलब्ध नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवशाही बस तांत्रिक कारणामुळे रद्द होत असल्यामुळे बसच्या ॲडव्हान्स बुकिंगसाठी दिलेले पैसे ऑनलाईन परत करण्याची व्यवस्था नसल्याने ते पैसे नागरिकांना दिले जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ऑनलाइन बुकिंगमधील तांत्रिक अडचणी दूर करून परिपूर्ण ऑनलाईन बुकींग सेवा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२६-०९-२०१८) :** (१) व (२) नाही.

राज्य परिवहन महामंडळाद्वारे प्रवाशांना ऑनलाईन बुकिंगची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, ऑनलाईन प्रणालीद्वारे करण्यात आलेले बुकिंग रद्द झाल्यास बुकिंगचे पैसे प्रचलित ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रवाशांना परत करण्याची व्यवस्था उपलब्ध आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पंतप्रधान पिक विमा योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(४४) १२१०२१ (३१-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पंतप्रधान पिक विमा योजनेत खूप मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कायवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१८) :**(१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०१७ अंतर्गत राज्यातील ८४.३४ लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेतला आहे. विमा कंपन्यांमार्फत प्राप्त अंतरिम अहवालानुसार ४८.४५ लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले असून रक्कम रु. २५१९.७६ कोटी नुकसान भरपाई निश्चित करण्यात आलेली आहे. त्यापैकी ४४.७९ लाख शेतकऱ्यांना रु. २३९४.२१ कोटी इतकी नुकसान भरपाई रक्कम वाटप करण्यात आलेली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशीम जिल्हयात आजारांपासून गुरांचा बचाव करण्यासाठी लसीकरण मोहीम राबविण्याबाबत**

**(४५) १२१५९० (२४-०७-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली),**

**श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीम जिल्हयात आजारांपासून गुरांचा बचाव करण्यासाठी लसीकरण मोहीम राबविली जाते, मात्र मागील काही दिवसापासून ही मोहीम बंद असल्याचे माहे मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उन्हाळयात दुधाळ जनावरांसह इतर गुरांना आजारांची लागण होत असल्याने त्यांना लस देणे आवश्यक असतानाही ही मोहीम न राबविल्यामुळे अनेक जनावरे लसीकरणापासून वंचित राहिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गुरांचा बचाव करण्यासाठी लसीकरण मोहीम राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१८-०९-२०१८) : (**१) व (२) हे खरे नाही.

(३) माहे मार्च व एप्रिल २०१८ या कालावधीत केंद्र सहाय्यीत लाळ खुरकुत रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत वाशीम जिल्हयात २,६७,२७९ गाय-म्हैस वर्गीय पशुधनास लाळ-खुरकुत रोगप्रतिबंधक, मान्सूनपूर्व लसीकरण कार्यक्रमांतर्गत माहे जुलै, २०१८ अखेर ३९,६२३ घटसर्प+फऱ्या रोगप्रतिबंधक, २,३०५ घटसर्प व ९५० फ-या रोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आलेला आहे.

लसीकरणाअभावी जिल्हयात कोणत्याही साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सलगर बुद्रुक (ता.मंगळवेढ़ा, जि.सोलापुर) येथील पशु वैद्यकीय दवाखान्यात पशुधन विकास अधिकारी रिक्त पद भरण्याबाबत

**(४६) १२२३२० (२५-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सलगर बुद्रुक (ता.मंगळवेढे, जि.सोलापुर) येथील पशु वैद्कीय दवाखान्यात पशुधन विकास अधिकारी हे पद रिक्त असल्यामुळे लाखो जनावरांचे आरोग्य धोक्यात आल्याचे दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पशु वैद्यकीय दवाखान्यात रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत प्रशासनाने कोणतीही कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपरोक्त सलगर बुद्रुक येथील पशुधन विकास अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-०९-२०१८) :** (१), (२) व (३) पशुधन विकास अधिकारी,पवैद श्रेणी-१, सलगर बुद्रुक,ता.जि.सोलापूर हे पद दि.३१.०५.२०१० पासून रिक्त असले तरी सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार पविअ, पवैद श्रेणी-१, मरवडे,जि.सोलापूर यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे. तसेच पशुवैदयकीय दवाखान्यामध्ये माहे डिसेंबर २०१३ पासून नियमित पशुधन पर्यवेक्षक कार्यरत असून त्यांचे मार्फत पशुपालकधारकांच्या जनावरांना नियमित वैद्यकीय सेवा पूरविण्यात येत आहेत. तसेच या पशुवैदयकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात गेल्या वर्षभरात कोणताही साथीचा रोग उदभवल्याची नोंद नाही.

शासन आदेश क्र.पसंप्र-२०१८/प्र.क्र.१४७/पदुम-१ दि. ३१. ०५. २०१८ अन्वये सदर दवाखान्यातील रिक्त असलेले पशुधन विकास अधिकाऱ्याचे पद बदलीव्दारे भरण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यात प्राण्यांच्या आजाराची मिनी पॉली क्लिनीक मंजूर करण्याबाबत

**(४७) १२२७४० (२४-०७-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील गाई, म्हशी, बैल, शेळ्या, मेंढ्या, पक्षी व इतर पाळीव प्राण्यांच्या आजारांची चिकीत्सा व शस्त्रक्रिया निदानासाठी मिनी पॉली क्लिनीक मंजूर करण्याबाबत मा.पशुसंवर्धन मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनात केलेल्या मागणीच्या अनुषंगाने करमाळा तालुक्यातील प्राण्यांच्या आजाराची चिकीत्सा व शस्त्रक्रिया निदानासाठी मिनी पॉली क्लिनीक मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२६-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सदयस्थितीत राज्यातील १६८ तालुक्यांच्या ठिकाणी तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय कार्यरत असून, उर्वरित १४९ तालुक्यांच्या ठिकाणी ही सुविधा उपलब्ध झालेली नाही. नवीन तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाची स्थापना करण्यासाठी विविध संवर्गातील एकूण ५ नवीन पदे आवश्यक आहेत.

राज्यातील विविध जिल्हयातील श्रेणी-२ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचा पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मध्ये दर्जावाढ करणे, नविन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची स्थापना करणे, तसेच, नवनिर्मित पंचायत समित्यांच्या ठिकाणी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) हे

नवीन पद निर्माण करण्यासाठी आवश्यक पदनिर्मितीचा प्रस्ताव सन २०१३ मध्ये वित्त विभागास सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने राज्याची वाढती महसूली तूट, राज्याच्या तिजोरीवरील ताण तसेच, आस्थापना खर्च मर्यादित ठेवण्याची निकड लक्षात घेता आर्थिक भाराच्या वाढीचे प्रस्ताव सादर करण्यात येवू नयेत, असे अभिप्राय दिलेले असल्यामुळे करमाळा, जि.सोलापूर येथे तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय स्थापन होऊ शकलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरूर (जि.बीड) तालुक्यात एस. टी. आगार सुरु करण्याबाबत

**(४८) १२४१४१ (२५-०७-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर (जि.बीड) तालुक्यात एस. टी. आगार सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोक प्रतिनीधींनी दिनांक १६ एप्रिल,२०१८ रोजी वा त्यासुमारास मा. परिवहन मंत्री यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीच्या अनुषंगाने शिरूर तालुक्यात एस. टी. आगार सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२६-०९-२०१८) :** (१) होय.

(२) शिरुर (कासार) तालुक्यापासून बीड आगार ४२ कि.मी., पाटोदा आगार ४२ कि.मी., पाथर्डी आगार ३७, शेवगांव आगार ५९ कि.मी., पैठण आगार ६६.१ कि.मी. आहे. शिरुर (कासार) हे ठिकाण या पाच आगारांच्या चतुष्कोणात मध्यवर्ती ठिकाणी असून तेथील प्रवाशांसाठी पुरेशी वाहतूक व्यवस्था पुरविली जात आहे. सद्यस्थितीत बीड विभागातील पाटोदा व आष्टी आगार हे कमी भारमानामुळे तोटयात आहेत. त्यामुळे आर्थिकदृष्टया शिरुर (कासार) येथे एस.टी. आगार सुरु करणे संयुक्तिक नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाकूर (जि.लातूर) तालुक्यात बसस्थानकाचे नुतनीकरण

**(४९) १२४३६९ (०१-०८-२०१८). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी-नागपूर (ता.चाकूर, जि.लातूर) या राष्ट्रीय महामार्गावर बस स्थानकाची निर्मिती दिनांक १४ फेब्रुवारी १९८८ रोजी वा त्यासुमारास झाली असून या बसस्थानकात रोज सरासरी ४०० बसेस सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बसस्थानकात प्रवाशांसाठी स्वच्छता गृह बंद असल्यामुळे महिला प्रवाशांची गैरसोय होत असून प्रवाशांना पिण्यासाठी पाणी व मूलभूत सुविधा नाही तसेच बसस्थानकाकडे असलेल्या जागेवर व्यापारी संकुलाच्या निर्मितीची मागणी लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री महोदयांकडे केली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चाकुर तालुक्यातील बसस्थानक येथे प्रवाशांना सोयी सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२६-०९-२०१८) :** (१) होय.

सदर बसस्थानकातून रोज जाणाऱ्या १४५ व येणाऱ्या १४५ अशा एकूण २९० बसेस धावतात.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) बसस्थानक परिसरात नगरपंचायतीने स्वच्छतागृह उपलब्ध करुन दिलेले आहे व त्याचा वापर सुरु आहे. सद्यस्थितीत बसस्थानकातील प्रसाधनगृह बंद आहे. बसस्थानकाची दुरुस्ती व रंगरंगोटीचा कार्यादेश देण्यात आलेला असून, उक्त कामांतर्गत बसस्थानकातील प्रसाधनगृहाची दुरुस्ती करुन घेण्यात येत आहे. नगर पंचायतीकडून नियमित पाणी पुरवठा होत नसल्यामुळे बसस्थानकात रांजण ठेवून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व आवश्यक असलेल्या मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळकोट (जि.लातूर) तालुक्यातील पशु कार्यालयास मंजूरी देण्याबाबत

**(५०) १२४९१० (३१-०७-२०१८). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळकोट (जि.लातूर) तालुक्यात पशु कार्यालय नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पशु कार्यालयास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२६-०९-२०१८) :** (१) जळकोट (जि.लातूर) या तालुक्याच्या ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ अस्तित्वात व कार्यरत असून या दवाखान्यासाठी पशुधन विकास अधिकारी हे पद मंजूर आहे. सदर पदावर अधिकारी कार्यरत आहेत. पंचायत समिती जळकोट (जि.लातूर) या नव निर्वाचीत पंचायत समितीच्या ठिकाणी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) हे पद मंजूर नसून या कार्यालयासाठी पशुधन पर्यवेक्षक हे पद मंजूर आहे व त्या पदावर कर्मचारी कार्यरत आहेत. असे असले तरी, पंचायत समिती जळकोट येथील पशुधन

विकास अधिकारी (विस्तार) या पदाची कामे पार पाडण्यासाठी पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ जळकोट येथील पशुधन विकास अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(२) राज्यातील विविध जिल्हयातील श्रेणी-२ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचा पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मध्ये दर्जावाढ करणे, नविन श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची स्थापना करणे, तसेच, नवनिर्मित पंचायत समित्यांच्या ठिकाणी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) हे नवीन पद निर्माण करण्यासाठी आवश्यक पदनिर्मितीचा प्रस्ताव सन २०१३ मध्ये वित्त विभागास सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने राज्याची वाढती महसूली तूट, राज्याच्या तिजोरीवरील ताण तसेच, आस्थापना खर्च मर्यादित ठेवण्याची निकड लक्षात घेता आर्थिक भाराच्या वाढीचे प्रस्ताव सादर करण्यात येवू नयेत, असे अभिप्राय दिलेले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.